# MITHI RIVER DEVELOPMENT AND PROTECTION AUTHORITY (MRDPA)



# Compendium of Authority Meeting

**MITHI RIVER DEVELOPMENT**

**& PROTECTION AUTHORITY**

# SEPARATOR

Minutes of 1st Authority Meeting

MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY MUMBAI

मिठी नदी तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रांतर्गत येणाऱ्या नद्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांसमवेत दिनांक १.९.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठक सुरुवात करण्यास अनुमती दिल्यानंतर महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी एन.जी.ओ. व इतर संबंधितांची ओळख करुन दिली. ओळख करुन देताना मिठी नदी, दहिसर, पोईसर, ओशिवरा आणि उल्हासनगर येथून वहाणारी वालधुनी नदी इत्यादि नद्याबाबत माहिती दिली. माहिती देत असताना तसेच शास्त्रीय दृष्टीकोनातून कोणती संस्था कोणत्या नदीबाबत अहवाल तयार करणार आहे याबाबतची माहिती दिली. त्यामध्ये प्रामुख्याने खालील माहिती दिली.

१अ) मिठी नदीचा सर्व सोयीयुक्त विकास करण्यासाठी सी. डब्ल्यू. पी. आर. एस. पुणे या संस्थेस हायड्रोजिकल अभ्यास करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच सी.ई.एस.ई. आय.आय.टी., मुंबई यांना पर्यावरणमुक्त विकास आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले आहे.

२) डब्ल्यू.ए.पी.सी.ओ.एस., नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या संस्थेस दहिसर, पोईसर आणि ओशिवरा इत्यादि नद्यांना येणाऱ्या पुराचे नियंत्रण करणे, पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून नदीकाठी असलेल्या झाडाचे संरक्षण करणे, या व इतर बाबीचा अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या.

३) उल्हास आणि वालधुनी या नद्यांना येणाऱ्या पुराचे नियंत्रण करणे, नद्यांकाठी असलेले अतिक्रमणे काढणे, पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून नद्याकाठी असलेले झाडांचे संरक्षण करणे या व इतर बाबींचा अभ्यास, स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी यांच्या सहकार्याने करण्याच्या सूचना दिल्या आहे.

महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी वरील माहिती दिल्यानंतर वरील सर्व संस्थांना त्यांच्याकडे असलेली व यापूर्वी त्यांनी केलेल्या अभ्यासाच्या अनुषंगाने सादरीकरण करण्यास सूचना महानगर आयुक्त यांनी केल्या. या सूचनेच्या अनुषंगाने वरील सदस्यांनी यापूर्वी केलेल्या अभ्यासाचे सादरीकरण केले. सादरीकरण झाल्यानंतर सर्व संस्थांनी लवकरात लवकर अहवाल द्यावा अशी विनंती करण्यात आली.

आयुक्त, महानगरपालिका यांनी निदर्शनास आणून दिले की, शहरात छोटी / मोठी नाले असून त्याचाही अभ्यास करुन सुधारणा करणे यक आहे.

प्रकरणाचे सादरीकरण पाहिल्यानंतर व सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांनी सूचना केल्या की, ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात प्रथम टप्प्याची कामे सुरु करावयाची असून यासाठी संबंधितांनी त्यांना सोपविण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक संस्थेने आपला अहवाल तात्काळ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उपलब्ध करुन द्यावा. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्याप्रमाणे नियोजन करावे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी खालील प्रमाणे निदेश दिले.

| अ. क्र. | मुद्दा | मा.मुख्यमंत्र्यांचे निदेश | संबंधित विभाग | अंमलबजावणी होण्यास अपेक्षित कालावधी. |
|---|---|---|---|---|
| १ | मिठी दहिसर, पोईसर, ओशिवरा, उल्हास, आणि वालधुनी इ.नदीचा शास्त्रीय दृष्टीकोनातून विकास करणे. | ऑक्टोबर,२००५ च्या पहिल्या आठवड्यात पहिल्या टप्प्याची कामे सुरु करण्यात यावी, यासाठी संबंधित संस्थांनी आपला अहवाल लवकरात लवकर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे द्यावा. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्याप्रमाणे नियोजन करावे. | संबंधित संस्था आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | दिड महिना. |

वरीलप्रमाणे निदेश घेऊन बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

*********